पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ ८१४ /२०१४
दिनांक : २६/०९/२०१४

प्रति,

मा.......................................
सदस्य, शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा दिनांक **०१/१०/२०१४** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **०१/१०/२०१४** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.शहर सुधारणा समिती
**कार्यपत्रिका क्रमांक - ०६**

दिनांक : **०१/१०/२०१४** वेळ : दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **०१/१०/२०१४** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

**विषय क्र.१)** मौजे पिंपळे निलख येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील स.नं.६५ पै. ते ६७ पै. १८.०० मी. रुंद रस्त्याचे आखणीमध्ये बदल करुन रस्त्यांची रुंदी २४.०० मी. करणेबाबत म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेबाबतची कार्यवाही चालू आहे. सदर प्रस्तावास मा.महापालिका सभेने ठराव क्र.३०० दि.२७/०६/२०१३ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे. सदर ठरावानुसार फेरबदल दर्शविणारा नकाशा उपसंचालक, नगररचना व विकास विभाग पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे कार्यालयात ठेवणेत आला होता. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आला होता. तसेच सदर फेरबदलाची जाहिर नोटीस दि.२१/११/२०१३ च्या दै.लोकमत या मराठी माध्यमाच्या वर्तमानपत्रात व दै.टाईम्स ऑफ इंडिया या इंग्रजी माध्यमाच्या वर्तमानपत्रात प्रसिध्द करणेत आली होती. महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये दि.०४/१२/२०१३ नुसार जाहिर नोटीस प्रसिध्द करणेत आली होती. सदर जाहिर नोटीशीच्या अनुषंगाने प्रस्तावित फेरबदलाबाबत नागरिकांच्या ३२ हरकती या विभागाकडे प्राप्त झाल्या आहेत. सदरच्या प्राप्त हरकतधारकांना दि.२१/०४/२०१४ रोजी सुनावणी देण्यात आली आहे. सुनावणीच्या वेळेस हरकतधारकांनी नमुद केलेले मुद्दे व हरकती यांचा विचार करुन मनपाचा अभिप्राय त्या बाबतचा अहवाल प्रस्तावासोबतच्या तक्त्यात नमुद केलेला आहे. सदर फेरबदलाचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनास मंजूरीसाठी सादर करणेस मान्यता घेणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ ८१४ /२०१४
दिनांक : २६/०९/२०१४ चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयाचे विषयपत्र (डॉकेट) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आले आहे.